3 NOV 2017
जनसंपर्क कक्ष
महाराष्ट्र टाईम्स शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गोखले कॉलेजमध्ये मंगळवारपासून परिषद

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

गोपाळ कृष्ण गोखले कॉलेज, नॉलेज पार्टनर सेंटर फॉर इंटरडिसिप्लिनरी रिसर्च, डी. वाय. पाटील, एज्युकेशन सोसायटी, शिवाजी विद्यापीठाचे डिपार्टमेंट ऑफ बायोटेक्नॉलॉजी यांच्या संयुक्त विद्यमाने आणि नागपूर येथील विश्वशांती मल्टिपर्पज सोसायटीच्या सहकार्याने विज्ञान व तंत्रज्ञानामधील नाविन्यपूर्ण संशोधन विषयावर आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित केली आहे. सात व आठ नोव्हेंबर आहे, अशी माहिती प्रा. डॉ. मंजिरी देसाई-मोरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

प्रा. डॉ. देसाई-मोरे म्हणाल्या, 'विज्ञान आणि तंत्रज्ञानामध्ये जागतिक स्तरावर नाविन्यपूर्ण संशोधन होत आहे. त्या आधुनिक घडामोडी आणि तज्ज्ञांचे विचार प्राध्यापक व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी परिषदेचे आयोजन केले आहे. परिषदेमध्ये चोन्न नॅशनल विद्यापीठाचे प्रो. डॉ. जीम हाइक किम, ऑस्ट्रेलियातील डॉ. जे. जीन. शीम, डॉ. दीपक दुबल, जर्मनीतील डॉ. टी. पी. गुजर, विद्यापीठाचे डॉ. शिर्के, डॉ. ज्योती जाधव, कतार येथील डॉ. डी.एस. ढवळे यांना व्याख्यानासाठी निमंत्रीत केले आहे. परिषदेमध्ये सहा निमंत्रीतांची व्याख्याने, ८९ मौखिक सादरीकरण व ९५ पोस्टर्स सादर करण्यात येणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 NOV 2017
लोकमत

## मंगळवारपासून कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील लोकविकास केंद्रातर्फे ५० वर्षे व त्यावरील वयोगटातील इच्छुकांसाठी 'लाईफ स्टाईल मॅनेजमेंट- संपूर्ण आरोग्य' विषयावरील १२ आठवड्यांची मोफत कार्यशाळा आयोजित केली आहे. या कार्यशाळेची सुरुवात मंगळवार (दि. ७)पासून होणार आहे. प्रत्येक आठवड्यातून एक दिवस व एक तास कार्यशाळा असणार आहेत.